<u>पदवीधर अशंकालीन उमेदवारांना विशेष बाब म्हणून कंत्राटी तत्वावर नोकरी उपलब्ध करुन देण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक. संकिर्ण ५०१८/प्र.क्र.८३३/आस्था-१४
२५ मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक : १७ जुन, २०१९

वाचा :

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ २०१४/प्र.क्र. ८०(भाग-३)/रोस्वरो-१, दि. १६.२.२०१८.

प्रस्तावना :-

राज्यातील पदवीधर अंशकालीन उमेदवारांचा मागिल १५ वर्षापासून प्रंलबित असलेला प्रश्न निकाली काढण्यासाठी तसेच अशा अशंकालीन उमेदवारांना विशेष बाब म्हणून कंत्राटी तत्वावर नोकरीची संधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता विकास विभागाने त्यांच्या संदर्भ क्र. १ येथील दि. १६.२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये एक समिती गठीत केली होती. या समितीने केलेल्या शिफारशीस अनुसरुन दि. ११.१२.२०१८ च्या मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामध्ये जिल्हा परिषद/ग्रामपंचायत यामध्ये संचमान्यतेपेक्षा शिक्षकांची पदे कमी असल्यास, त्या-त्या शैक्षणिक वर्षासाठी किंवा शिक्षकांची नियमित नियुक्ती होईपर्यत पदवीधारक (बी.एड.)/पदविकाधारक (डी.एड.) अशंकालीन उमेदवारांना तासिका तत्वावर किंवा करार पध्दतीने कामे देण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

शासन निर्णय :-

मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या शाळांमध्ये त्या शैक्षणिक वर्षात संचमान्यतेपेक्षा शिक्षकांची पदे कमी असल्यास अथवा अन्य कारणाने संचमान्यतेच्या संख्यप्रमाणे शिक्षक उपलब्ध न झाल्यास, जिल्हयामध्ये

शिक्षकांची नियमित नियुक्ती होईपर्यत फक्त त्या शैक्षणिक वर्षासाठी अशा रिक्त पदावर आवश्यकतेनूसार शैक्षणिक अहर्ता धारण करीत असलेल्या अशंकालीन उमेदवारांना शिक्षण सेवकांना ज्या पध्दतीने नियुक्त्या देण्यात येतात त्या पध्दतीने संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियुक्ती द्यावी.

अशा प्रकारे नियुक्ती देण्यासाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम ९६ (१) अन्वये नियुक्ती प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी हे सक्षम प्राधिकारी आहेत. या नियुक्त्या देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हयातील अंशकालीन उमेदवारांची यादी, त्यांच्या जिल्हयाच्या, सहायक संचालक, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी. त्या अशंकालीन उमेदवारांना त्यांच्या ज्येष्ठतेनुसार शिक्षण सेवकांना ज्या पध्दतीने नियुक्त्या देण्यात येतात त्या पध्दतीने नियुक्ती देण्यात यावी. अशा नियुक्त्या देत असताना, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित उमेदवारांचा वैयक्तिक तपशिल तपासून घेवून, त्यानंतरच त्यांना नियुक्ती द्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१९०६१७१५३२५९८०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Aseem Surendrakumar Gupta
Date: 2019.06.17 18:05:22 +05'30'

(असीम गुप्ता)
प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व अपरमुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
८) सर्व विभागीय आयुक्त
९) आयुक्त, कौशल्य विकास, कोकण भवन, नवी मुंबई.
१०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११) सर्व जिल्हयाचे, सहायक संचालक, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र
१२) उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
१३) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
१४) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग,
१५) निवड नस्ती कार्या क्र.आस्था-१४, ग्रामविकास विभाग, मुंबई-३२